नोटीस

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी ४११ ०१८.

माध्यमिक शिक्षण विभाग

माध्य/शि/०१/कावि/९७/२०२४

दिनांक-१८/११/२०२४

प्रति,

श्री.अदिनाथ शहादेव कराड

(सहाय्यक शिक्षक)

माध्यमिक विद्यालय,फुगेवाडी भागशाळा

बोपखेल

विषय – श्रीम.पालवे मोहीनी प्रंशात (सहाय्यक शिक्षिका) यांच्या तक्रार अर्जाबाबत...

संदर्भ – श्रीम.पालवे मोहीनी प्रंशात (सहाय्यक शिक्षिका) यांचा दि.१७/१०/२०२४ चा तक्रार अर्ज

२/-तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंतर्गत माध्यमिक विद्यालय फुगेवाडी भागशाळा बोपखेल या विद्यालयात सहाय्यक शिक्षक या जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहात.तुम्हाला सहाय्यक शिक्षक या पदाची जबाबदारी व कर्तव्य ज्ञात असणे तुम्हास आवश्यक आहे.

संदर्भीय पत्रान्वये श्रीम.पालवे मोहीना प्रशांत (सहाय्यक शिक्षिका) यांनी तुमच्या बाबत तक्रार अर्ज या कार्यालयाकडे सादर करणेत आलेला आहे.श्रीम.पालवे मोहीनी सहाय्यक शिक्षिका यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की श्री.कराड अदिनाथ शहादेव सहाय्यक शिक्षक हे इतर शिक्षकांजवळ श्रीम.पालवे ह्या मुर्ख आहेत व त्यांना कामकाज जमत नाही असे म्हणतात.त्यांच्या डोक्यात फरक आहे व त्या नालायक आहेत. अशा प्रकारे अपशब्द वापरून माझी बदनामी करतात.तसेच माध्यमिक विभागाच्या भागशाळा आम्ही सुरू केलेल्या आहेत, तुम्ही भागशाळेत कामकाज करू नका तुम्ही इतर विद्यालयात बदली करून घ्या. असा माझ्यावर दबाव आणत आहेत. तसेच माध्यमिक शिक्षण विभागातील कर्मचारी माझ्या खिशात आहेत. माझे कुणी काहीच करू शकत नाही.त्यामुळे मी तुम्हाला त्रास देणार, अशा प्रकारच्या मला ते धमक्या देतात. तसेच श्री.कराड यांच्या पत्नी श्रीम.संगीता अदिनाथ कराड यांचा व माझा काहीही संबध नसतानाही त्यांनी मला धमकी दिलेली आहे. त्यामुळे माझे कुटूंब प्रचंड मानसिक तणावाखाली आहे. या ताणतणावामुळे माझी जिवीतहानी झाल्यास त्याला सर्वस्वी श्री.कराड अदिनाथ शहादेव सहाय्यक शिक्षक हे जबाबदार असतील असे नमुद करणेत आलेले आहे. तरी,याबाबत आपण सदर नोटीस मिळाल्यापासुन ०३ दिवसात खुलासा सादर करणेत यावा.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे - १८

प्रत,

१)मुख्याध्यापक, मा.वि.फुगेवाडी भागशाळा बोपखेल

२/- सदर नोटीस संबधीतांना बजाउन पुर्तता अहवाल इकडिल कार्यालयास सादर करणेत यावा.